| MHPU120003452024 | **नियमित दिवाणी दावा क्र.७९/२०२४ मधील नि.क्र.५९ वरील आदेश**<br>श्री.अर्चना दिनकर भुजबळ विरुध्द<br>श्री.बारीकराव विठ्ठल पडवळ व इतर |
|---|---|

प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा एकतर्फा आदेश व विना कैफियत आदेश रद्दबातल करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ हे घरात पाय घसरुन पडल्याने ते न्यायालयात उपलब्ध राहू शकले नाहीत. तसेच प्रतिवादी क्र.२ हे देखील अनुपस्थित राहिलयाने त्यांच्या विरोधात देखील कैफियत नाही असा आदेश पारित करण्यात आलेला आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचा प्रत्यक्ष ताबा असून त्यांचे देखील हक्क व अधिकार आहेत. त्याकरीता प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर असणे आवश्यक आहे. सबब, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०३.** वादी यांनी त्यांचे म्हणणे नि.६१ वर दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी यांनी दिलेला अर्ज खरा व बरोबर नसून कायदेशीर नाही. तसेच प्रतिवादी यांनी कोणतेही संयुक्तिक कारण दिलेले नाही. त्यामुळे सदरील अर्ज फेटाळण्यात यावा. तसेच समन्स मिळूनही केवळ त्रास देण्याच्या हेतूने व प्रकरण लांबविण्याच्या हेतूने जाणीवपूर्वक प्रतिवादीने कैफियत मुदतीत दाखल केलेली नाही. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

**०४.** वादी व प्रतिवादींच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या कथनांशी सुसंगत असा युक्तीवाद केलेला आहे.

**०५.** सुरुवातीस हे नमूद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्याच्यांविरोधात पारित करण्यात आलेल्या आदेशाबाबत स्वतंत्र अर्ज देणे आवश्यक होते. परंतु त्यांनी त्याबाबत स्वतंत्र अर्ज दाखल केलेले नाहीत. परंतु केवळ सदर तांत्रीकतेचा अवलंब करुन

सदरचा अर्ज फेटाळणे न्यायोचित होणार नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रतिवादी क्र.२ यांनी विहित मुदतीत त्यांची कैफियत दाखल केली नसल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादी क्र.१ हे हजर न झाल्याने त्यांच्याविरोधात एकतर्फा आदेश पारित करण्यात आलेला आहे. प्रस्तुत दावा हा वाटप, ताबा व निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीत वादी व प्रतिवादी यांचे हक्क व हितसंबंध प्रस्तुत दावा मिळकतीत असल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार प्रतिवादींना संधी देणे आवश्यक आहे. सबब, प्रतिवादींविरुध्द झालेला आदेश रद्द होणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. परंतु प्रतिवादी यांनी विलंबाकरीता दिलेले कारणाच्या पुष्टयर्थ प्रतिवादी यांनी कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. सबब, काहीअंशी खर्च बसवून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

**१.** प्रतिवादी यांचा अर्ज नि.५९ मंजुर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी यांनी वादी यांना रक्कम रु.१०००/– इतका दंड पुढील तारखेपर्यंत दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2025.11.07 17:34:42 +0530

**ठिकाण – भोर** **( एस.डी.शिरसाट )**

**दिनांक – ०७.११.२०२५.** **०२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भोर .**